# चारोळ्या – भाग २८

गंध बहरले, तुझ्या अंगणी
मला ग भारी त्याचे कौतुक
कसे सांगू मी, तुला ग सजणी
तुला भेटण्या, मीहि उत्सुक.

पुरे झाला खेळ तुझा हा
स्वप्नी येऊन छळण्याचा
अंत नको पाहू माझा
राग सोडुनी, ये आता.

नकोस लाजू, तू जराही
सांग मनातील सारे
तुझी नि माझी प्रीत पाहुनी
नभात जळती तारे.

तू हसल्यावर, मी मोहरते
तू रुसल्यावर, मी बावरते
मनास माझ्या, मी विचारते
तुझे नि माझे, कसले नाते?



– पद्माकर चित्रे

(‘मी न माझा’ या चारोळीसंग्रहातून)